म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १४५५६५
१९८०

# महाराष्ट्र गौरव गीत

REFBK-0011224
REFBK-0011224

श ब्द रं ज न स्प र्धा प्र का श न

नकाशा पुढें पाहतां भारताचा,
महाराष्ट्र आधीं भरे लोचनीं ॥

— यशवन्त

'शब्दरंजन' स्पर्धेतर्फे प्रसिद्ध होणारा महाराष्ट्र-गौरवगीतांचा हा संग्रह म्हणजे 'महाराष्ट्र'-शारदेच्या दरबारांत होणारें हें शब्दसृष्टीच्या ईश्वरांचें काव्यवाचनच होय. भोजनाच्या वेळीं ओळखीच्या माणसाशेजारीं बसावें तसे हे सारे कवि एका पंक्तींत बसले आहेत एवढेंच — यापलीकडे इथें पंक्तिप्रपंच नाहीं. इथें प्रपंच आहे तो अक्षरांचा — शब्दांचा — या जाणीवेनेंच या संग्रहांतील कवींनीं या संग्रहामध्यें आपली हजेरी लाविली आहे.

महाराष्ट्राच्या या पर्वकालीं महाराष्ट्रगौरवपर गुणगान करतांना मराठी रसिकवर कविवर्यांनीं आपल्या कवितांतून येथें आकांक्षा, चिंतन आणि दर्शन यांचा जो आविष्कार केला आहे तो या संग्रहाचा एक विशेष असून या संग्रहाचें हें वैशिष्ट्य हा संग्रह वाचतांना पानोपानीं आपल्याला जाणवल्याखेरीज राहाणार नाहीं.

# महाराष्ट्र गौरव गीतें

श्री. कृ. कोल्हटकर
यशवन्त
गिरीश
काव्यविहारी
स. अ. शुक्ल
वा. गो. मायदेव
ग. दि. माडगूळकर
बा. भ. बोरकर
मंगेश पाडगांवकर
शान्ता शेळके
चारुशीला गुप्ते
सोपानदेव चौधरी
पु. शि. रेगे
श्रीकृष्ण पोवळे
राजा बढे
पी. सावळाराम
विद्याधर गोखले
वि. दा. वऱ्हाडपांडे
चकोर आजगांवकर
गंगाधर महाम्बरे
सुशिला बापट
श्रीरंग समडोळीकर
ना. रा. मोरे
वासुदेवसुत कारेकर
वसन्त अवसरे
सूर्यकान्त खांडेकर
मधुमालती गोडबोले
आशा दामले

शब्दरंजन
स्पर्धा
प्रकाशन

99226
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

संपादक
गंगाधर महाम्बरे

किंमत रु. १.५०

© शब्दरंजन स्पर्धा १९६०
प्रथमावृत्ति : शिवजयंति, २७ एप्रिल १९६०

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
जयंत साळगांवकर
शब्दरंजन स्पर्धा
मोरबाग रोड, मुंबई १४

एकमेव विक्रेते
श्रीसमर्थ ग्रंथभवन
बनाम हॉल लेन
गिरगांव, मुंबई ४

नव - महाराष्ट्राचे
नेते
आणि
महाराष्ट्राचे
पहिले
मुख्य मंत्री
सन्माननीय
नामदार
यशवंतराव
बळवंतराव
चव्हाण
यांस
सादर
समर्पण

# निवेदन

कोटी कोटी मराठी मनांची गेल्या कित्येक तपांची आकांक्षा आज सुफलित होत आहे. मायबोली मराठी आज स्वतःच्या हक्काच्या घरांत शाही इतमामानें राहावयास आली आहे.

मराठी भाषिकांच्या हृदयसागराला आनंदाचें उधाण आणणारा हा परम मंगल प्रसंग! अशा आनंदाच्या प्रसंगीं उगवत्या मराठी राज्याला शब्द-फुलांचें अर्घ्य वाहावें, असें अंतःकरणपूर्वक वाटलें. 'शब्दचि आमुच्या जीवाचेंजीवन' ही संतोक्ति शब्दरंजन स्पर्धा शिरावर अभिमानानें धारण करीत असली, तरी आजच्या प्रसंगींचें महाराष्ट्रस्तोत्र स्पर्धेच्या मर्यादित क्षेत्रापुरतेंच असून रुचलें नसतें म्हणूनच सर्व मराठी भाषिकांना पसंत पडेल, असें वेगळें आगळें प्रकाशन ह्या निमित्तानें प्रसिद्ध करावें असें ठरविलें व महाराष्ट्र-गौरव-गीतांची कल्पना निघाली. "शब्दसृष्टीच्या ईश्वरांना" एकेक अक्षराची भीक मागितली आणि त्यांतूनच हें पुस्तक जन्मास आलें. आमच्या विनंतीस मान देऊन मुद्दाम कविता लिहून पाठविल्याबद्दल आम्ही सर्व कविमित्रांचे आभारी आहोंत.

गेल्या ऑक्टोबरांत शब्दरंजन स्पर्धेतर्फे सव्वादोनशें रुपयांचीं बक्षिसें ठेवून महाराष्ट्रगौरवगीत स्पर्धा जाहीर करण्यांत आली होती. ह्या स्पर्धेत आलेल्या बक्षिसपात्र व कांहीं निवडक कवितांचा समावेश ह्या संग्रहांत करण्यांत आलेला आहे.

ह्या पुस्तकाच्या संपादनाची जबाबदारी माझे मित्र श्री. गंगाधर महाम्बरे यांनीं उचललेली आहे. हें पुस्तक अल्पावधींत व चांगल्या प्रकारें प्रसिद्ध होण्याचें श्रेय त्यांनाच आहे.

शब्दरंजन स्पर्धा ही एक आदर्श व लोकोपयोगी कार्य करणारी संस्था व्हावी म्हणून आमचे प्रयत्न आहेत. स्पर्धेतर्फे अल्प किंमतींत प्रकाशित होणारें सद्विचारप्रधान वाङ्मय हा अशा प्रयत्नांचाच एक भाग. ह्यापुढील कालांत अशा स्वरूपाचीं मोठीं प्रकाशनें सिद्धीस नेण्याचें सामर्थ्य परमेश्वरानें द्यावें ही प्रार्थना.

**प्रकाशक**

महाराष्ट्र गीत श्री. कृ. कोल्हटकर ७
मंत्राक्षता यशवन्त ९
जयमहाराष्ट्र गिरीश १२
महाराष्ट्र गौरव काव्यविहारी १५
सिंहासनिं बैसली मराठी ! स. अ. शुक्ल १८
मंगल दिन आला ! वा. गो. मायदेव २१
आज आनंदाचे वनीं ग. दि. माडगूळकर २२
उभ्या भारताचा पहारेकरी बा. भ. बोरकर २४
जय महाराष्ट्र मंगेश पाडगांवकर २६
माय मराठी, नांव मराठी शान्ता ज. शेळके २८
प्रणाम घेई महाराष्ट्रा चारुशीला गुप्ते ३१
नवमहाराष्ट्रा ! सोपानदेव चौधरी ३२
महाराष्ट्र गीत पु. शि. रेगे ३५
नमोस्तुते महाराष्ट्रा श्रीकृष्ण पोवळे ३६
गर्जा महाराष्ट्र माझा राजा बढे ३७
महाराष्ट्राच्या कृष्णेकांठीं पी. सावळाराम ३९
सह्याद्री पी. सावळाराम ४०
त्रिभंगलेला अभंग झाला विद्याधर गोखले ४१
महाराष्ट्र गीत वि. दा. वऱ्हाडपांडे ४३
माझें राष्ट्र महान चकोर आजगांवकर ४५
महाराष्ट्राचें गान गंगाधर महाम्बरे ४६
महाराष्ट्राचा अभिमान सुशिला बापट ४७
महाराष्ट्र हें माझें मंदिर श्रीरंग समडोळीकर ५०
वारकरी हा, धारकरी हा ना. रा. मोरे ५२
श्रीमहाराष्ट्र-गौरव-गीत वासुदेवसुत कारेकर ५४
महाराष्ट्र गौरवगीत वसंत अवसरे ५७
अमुची माय मराठी ही सूर्यकान्त खांडेकर ५९
श्रीमहाराष्ट्र गौरव-गीत मधुमालती गोडबोले ६१
महाराष्ट्र गौरव आशा दामले ६३

दा. क्र. 99220
शाखा (स्थळ

# महाराष्ट्र गीत

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ ध्रु० ॥

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें
आकांक्षापुढतिं जिथें गगन ठेंगणें
अटकेवरि जेथिल तुरंगिं जल पिणें
तेथ अडे काय जलाशय नदांविणें
पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा १

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें ?
सद्भावांचींच भव्य दिव्य आगरें !
रत्नां वा मौक्तिकांहीं मूल्य मुळीं नुरे
रमणीची कूस जिथें नृमणि खनि ठरे
शुद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा गृहा २

नग्न खड्ग करिं, उघडें बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंही शौर्य मावळे
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथिले
भासति शतगुणित जरि असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा ३

विक्रम वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्मराजकारण समवेत चालती
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ ४

गीत मराठ्यांचें श्रवणिं मुखिं असो
स्फूर्ति दीप्ति, धृतिहि देत अंतरीं ठसो
वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र-धर्ममर्म मनिं ठसो
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा ५

— श्री. कृ. कोल्हटकर

# मंत्राक्षता

[ मंदारमाला ]

" माझा महाराष्ट्र, मी हा मराठी "
        अशा घोषणांनीं पुरें गोपुरें —
गेलीं निनादून. उंडारलीं तेंवि
        ह्या घोषणांनीं शिवारीं गुरें,
लाटा – करीं फेन – माला धरोनी
        उभा सिंधु हा ज्याचिया स्वागता
त्या पर्वकाळाचिया पूजनीं मी
        समर्पूं सजे आज मंत्राक्षता

" माझा महाराष्ट्र होईल संपन्न
        सामर्थ्यशाली कसा केधवा "
प्रत्येक ही हालचालींत माझ्या
        स्फुरावी सदा दाटलेली हवा.
" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी !"
        असा विक्रमा ध्यास माझ्या हवा
ग्लानीमधें तेवि झोपेमधेंही
        असा श्वास – उच्छ्वास माझा हवा.

" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी "
        छिनीनेंच ह्या हो घडावा चिरा

ऐसा चिरा कोहिनूराहुनी त्या
ठरावा न का दिव्यदीप्ती हिरा ?
" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी "
गिलावा जरी हा घरा मंदिरा
तेथें पहारा न लागेल, कोणा—
कधींही न फावेल त्या तस्करा.

" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी "
अहो, एक ह्या तालठेक्यावर
लागे जरी वावराया शिवारीं
विळा कोयता मोट वा ट्रॅक्टर
तेथें नफा आणि तोटा कुणाचा
कुणाचा धनी कोण वा चाकर ?
चालावयाच्या न तेथें कुऱ्हाडी
कधींही कुणाच्याहि मानेवर

" मी हा मराठी " उरीं रोमरंध्रीं
असा दाटता गाढ माझेपणा
कां व्हायचे ना लुळे हात ते हो
उगारून येतील जे जे घणा
" माझा महाराष्ट्र, मी हा मराठी "
जरी प्रेमपान्हा उरीं पाझरे
वैराग्निचे जाति-जातींतल्या का
फुलावेत तेथें निखारे बरें ?

" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी "
असो हाच ताईत गंडा-गळां

यज्ञोपवीताचिया धारणाचा
घडो ह्या न मंत्राविना सोहळा
एकात्मतेला तडे जावयाची
कुणालाहि यावी न शंका कधीं
ह्या धोरणानें प्रवर्तेल जो तो
विवंचूनि वागेल मंत्री सुधी

"आम्ही मराठी, महाराष्ट्र धर्मी"
असा घोष येतांच कानांवरी
जे संभ्रमीं, संकटीं, कर्दमीं त्या
नवा धैर्य-संचार व्हावा उरीं
"आम्ही मराठी, महाराष्ट्रधर्मी"
पताका अशी ब्रीद-मुद्रांकिता
देखोन वाटेल दैत्यां दरारा,
महन्मंगला तारिणी भारता.

—यशवन्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम २५५०३४ वि: का...
क्रमांक १४५६ नों. दि: २६/५/५०

# जय महाराष्ट्र !

( जाति : सूर्यकांत )

जय, जय, जय हे महाराष्ट्र ! तूं भारतमुकुटीं हिरा !
मंगल, कणखर, ऊर्जस्वल तूं मराठमोळा खरा ! ॥ ध्रु० ॥

परंपरा तव थोर पौरुषी, गुणशौर्यें निर्मिली !
मायभवानी, माय मराठी; सामर्थ्यें पूजिली !
पिढ्यापिढ्यांतुन एक मराठी वळण दिलें अंतरा ! १

पारतंत्र्य तुज कधीं न रुचलें ! बंडखोर तूं मनीं !
झुगारिल्या तूं रूढी, अपुल्या परंपरा राखुनी !
शिपाइबाणा सत्यशोधनीं बिलगे तुझिया स्वरा ! २

शकक[1]र्ते कुणि, उदार यादव[2] देवगिरी उभविती !
छत्रपतींचें गौरीशंकर[3]-शिखर शोभतें किती !
बाजी[4]-माधवतेजें भरला सह्याद्रीचा दरा ! ३

महानुभावी[5] ज्ञानेशांची रसवंती अमृता—
जिंकुन, निर्मी नामा[6], एका, कैवल्याची कथा !
समर्थ-तुकया-शाहीरांनीं जिवंत केला चिरा[7] ! ४

---

१ विक्रमादित्यादि राजे ग्वालेर. २ दौलताबादचे राजे. ३ श्रीमत् शिवाजीमहाराजांच्या कर्तृत्त्वाचें सर्वोच्च शिखर. ४ पहिले बाजीराव व थोरले माधवराव पेशवे. ५ महानुभावपंथी कवि : पक्षी-महानुभव घेतलेले. ६ नामदेव, एकनाथ : पक्षी-साक्षात् कैवल्य असें नाम. ७ महाराष्ट्रांतील दगडन् दगड.

दमयंती[८]-रुक्मिणी चमकल्या थोर तुझ्या कन्यका !
जिजा[९], अहिल्या[९], उमा[९] न करिती जन्म तुझा धन्य का ?
झांशीवाली लक्ष्मी पिउनी आग, भूषवी धरा ! ५

अवदशेंतही रंगो बापू, प्रताप[१०], नानांसवें[११]—
फडके[१२], मागुन वीर विनायक[१३] चेतवितीं आसवें !
फुले, रानडे, टिळक, गोखले, सुधारकांची[१४] गिरा ! ६

कलाकुसर तव पहाडांतुनी राउळांत पसरली;
कैलासाचें[१५] अनुपम लेणें साक्ष देइ भूतलीं !
गाननर्तनीं, चित्रकारांनीं[१६] सजवियलें मंदिरा ! ७

वाग्वीरांनीं आज 'तुतारी[१७]' प्राणस्वर फुंकिली !
डफ[१७]-वीणेवर ज्वलत् अस्मितागीतें नव गुंफिलीं !
अमोल उसळे स्वप्नाळूंच्या नववाणीचा झरा ! ८

मांगल्याची खाण शोधिली भावभक्तिनें तुवां ;
वारकऱ्यांचा[१८] धारकऱ्यांशीं[१८] तूंच जोडिला दुवा !
प्रेरक होतीं शाळु, कपाशी, भात, गहूं, हरभरा ! ९

---

८ विदर्भांतील राजकन्या. ९ स्वराज्यसंस्थापक श्रीमत् शिवाजी राजे यांच्या मातुःश्री श्री जिजाबाई ; श्री अहिल्याबाई होळकर, इंदूर ; श्री उमाबाई दाभाडे, तळेगांव. १० श्री. प्रतापसिंह भोसले, सातारा व त्यांचे दिवाण रंगो बापू. ११ नानासाहेब (शेवटचे) पेशवे. १२ हरिपंत ; वासुदेव बळवंत. १३ श्री. वि. दा. सावरकर. १४ आगरकर. १५ वेरूळचें कैलासलेणें. १६ अजिंठा आदि स्थळांतील चित्रकार. १७ आजचें भावगीतें, पोवाडे-लावण्या व अभंग-ओवी यांचें लिखाण. १८ महाराष्ट्र-धर्माची शिकवण.

श्रमगंगा ही शेतकऱ्यांची वाहे काळींतुनी !
माय विनोबा[१९] डोळाभर ती बघती आनंदुनी !
महात्मतेच्या[२०] शिवशक्तीचा गुरु तूं अनू मोहरा ! १०

—**गिरीश**

---

१९ आजचे महान संत विनोबा भावे. २० महात्मा गांधींचीं अतुल्य शक्तिसामर्थ्यें.

## महाराष्ट्रगौरव

थोर महाराष्ट्राचा भाग्यरवी ये उदया
मोदभरें सुस्वागतगीत गोड गाऊं या.

वंद्य श्रीशिवरायें परवशता निर्दाळुन
भूषविलें रायगडीं रत्नजडित सिंहासन.

अध्यात्मिक बल संतत वैराग्यें वाढवुनी
महाराष्ट्रधर्म इथें जागविला संतांनीं.

शिवशक्ती ग्रासाया अगणित दुरितें आलीं
मर्द महाराष्ट्रानें लीलेनें ठोकरलीं.

त्याकाळीं ऐकुनियां नांव महाराष्ट्राचें
थरथरलें भीतीनें मयुरासन दिल्लीचें

परि फिरतां कालचक्र आंग्ल युरोपीय येत
अविलंबें ग्रासियला त्यांनीं अवघा भारत.

परवशताघनिं चमके बिजली झांशीवाली
देखुनियां पोलादी परसत्ता हादरली.

निष्ठुर परसत्तेशीं मग संतत जोमानें
झुंज दिली टिळकांच्या याच महाराष्ट्रानें

वीरविनायक, बापट, राजगुरू, कान्हेरे
प्राणपणानें लढले क्रांतिसिंह हे सारे

मग सत्याग्रहसंगर भारतांत जो झाला
त्यांत महाराष्ट्रानें नव विक्रम गाजविला

निमुटपणें मग गेली परसत्ता येथोनी
मंगलदिनिं राष्ट्रध्वज फडफडला अस्मानीं

अखिल महाराष्ट्राचीं विस्कळलीं जीं शकलें
एकसंघ होत आज भारतांत यत्नबलें

बेळगांव गोमंतक आदि अजुनि यायाचे
चित्र पुरें होइल मग थोर महाराष्ट्राचें.

प्रबल महाराष्ट्र बघुनि एकसंघ झालेला
झालासे हर्ष बहुत आज सकल सृष्टीला

* सिंधूसागरलाटा नाचतात हर्षानें
डोलतात आनंदें कोंकणचीं माडबनें.

आशीर्वच द्यावयास कृपाछत्र धरूनि वरी
सज्ज उभे रामटेक, सातपुडा सह्यगिरी

---

* अरबी समुद्र.

उत्सुक कृष्णा गोदा आणि कितिक गिरितनया
शूर महाराष्ट्राला आशीर्वचना द्याया.

आपणही सुस्वागतगीत गोड गाऊं या
थोर महाराष्ट्राचा भाग्यरवी ये उदया.

—काव्यविहारी

# सिंहासनिं बैसली मराठी !

सिंहासनिं बैसली मराठी, आली दरबारा
अलम् मराठी दुनियेचा तिज मानाचा मुजरा

धन्य पुण्यदिन ! ‘ महाराष्ट्र ’ हा उदयाला आला
दिव्य भव्य आनन्द - सोहळा नवलाचा नटला

‘ महा राष्ट्र जय महाराष्ट्र ’ ही चलाचलीं ललकार
सह्याद्रीच्या कडेकपारीं घुमला जयजयकार

कोटि कोटि कण्ठांतुनि उसळे प्रचण्ड जयघोष
रायगडींची समाधि डोलत, पावत सन्तोष

अणुरेणुंत चैतन्य उफाळत अभिनव अपरम्पार
अनेक शतकांचें सोनेरी स्वप्न आज साकार

मायभवानी कुलस्वामिनी श्रीशिव–वरदायिनी
देत शुभाशीर्वाद निरन्तर महाराष्ट्रतारिणी

भीमा, कृष्णा आणि कोयना, पूर्णा, गोदावरी
यशोगान साभिमान गाती वात्सल्यें भारी

अजिंक्य प्यारे शिवरायाचे हे दुर्गम दुर्गही
देती ताजिम खडी आदरें मानवन्दनाच ही !

वसन्त हंसरा परिवारासह उधळत सुन्दरता
शुकपिक कोकिळ मंजुळ गाती सुस्वागत-गीता

ध्वजा-तोरणें उभवि तरुलता-नवपल्लव-सम्भार
वसुन्धरा सुन्दरा साजरा ल्यालि साज-शिणगार

सर्वभद्रकर अपूर्व मंगल पर्वकाल आला
नव्या युगाचें नव्या जगाचें आवाहन सकलां

जरिपटका अन् भगवा झेण्डा सांगत गुरुमन्त्र
येथ विक्रमासह वैराग्यहि नान्दत एकत्र

चातुर्याची जोड लाभतां सुफलित हो शौर्य
शक्तियुक्तिच्या संयोगानें साधतसे कार्य

सुरलोकाहुनि थोर मराठी मातीचा महिमा
शिळेंतुनी प्रकटत पुरुषोत्तम उजळत दैन्य-तमा

वीर मराठ्याचा बाहू दे न्यायाची ग्वाही
दुमदुमली दशदिशांत सन्तत नीतीची द्वाही

ताठ मराठी मान न लवली कधिंही जुलुमापुढें
शिवशक्तीच्या वज्रमुष्टिनें मरण मरे बापुडें

शिवप्रभु प्रिय दैवत; जीवन-संजीवनमर्म
स्मरुनि तयाचा प्रताप वाढवुं महाराष्ट्रधर्म

एकदिलानें बुद्धिबलानें अखण्ड कष्टुनियां
निर्मूंया नव महाराष्ट्र ज्या नांवाजिल दुनिया

विसरुनि भेदाभेद विविध ते जातिधर्मपन्थ
महाराष्ट्र-नववैभवमन्दिर उभवुं शोभिवन्त

समर्थ सार्थच आर्तरक्षणास्तव हा रणमस्त
महाराष्ट्र हो भारतभूचा सबल खड्गहस्त

शान्तिसुखाचें समृद्धीचें महाराष्ट्रराज्य
समता–ममता–सहकार्याचें मंगल साम्राज्य

देत जगाला नित समतेचा उज्ज्वल सन्देश
भारतभूषण तेजस्वी श्रीमहाराष्ट्रदेश !

—सदाशिव अनन्त शुक्ल

# मंगल दिन आला !

( चाल : भजन कर लेना )

पहा महर्षे ! तूं वांछियला मंगल दिन आला !
आला ! मंगल दिन आला !

शताब्दिकालीं तूं प्रकटविली जैं अपुली आशा
महाराष्ट्रगगनाच्या तैं तूं पूर्ण उजळिल्या आशा !

कुणी निन्दिलें तुला म्हणाले म्हातारा चळला
मराठी-मना महामंत्र तव शब्द परी कळला

कुणी म्हणाले औचित्या तूं कलंक लावियला
कचरणार पण कधिं न मराठा मनचें बोलायाला

कुणी बोलले दिसतें याला लिहुन दिलें कोणी
खरेंच कळण्या कठिण कोणतें ताक आणखी लोणी !

जीवन ज्यानें सर्व वेंचिलें पुण्यें करण्यांत
देवहि मानी धन्य तयाचे हेतु पुरविण्यांत

तुझ्याच वदनें होवो येती शुभदिन ललकारी
महाराष्ट्र जय ! सर्व मराठा वदुं दे जयजयकारीं !!

—वा. गो. मायदेव

# आज आनंदाचे वनीं

आज आनंदाचे वनीं
उभें ठाकलें भुवन,
एका समर्थ स्वप्नांत
आज जागलें जीवन

पैज जिंकली, जिंकली
आज हरलें अमृत,
पुनः पोहले अभंग
इंद्रायणीच्या पाण्यांत

सह्यगिरी - शिरीं उठे
युगंधराचें पाऊल,
जाग्या निमिषाला लागे
नव्या शकाची चाहूल

दुखावता अभिमान
आज सोडितो निःश्वास,
छातीबाहेर ओसंडे
' उद्यां ' वरचा विश्वास

सम-चरणा-तळींची
बळकट झाली वीट,
आर्त, अपेक्षित यांची
उराउरीं झाली भेट

लाख मनाचें पारणें
आज डोळ्यांनीं फेडलें
आठ कोटि शिरांवर
राज-मुकुट चढले

लोकशक्तीचा विजय
गाजे भारताच्या पाठीं
आज राणीवे बैसली
मायमाउली मराठी

—ग. दि. माडगूळकर

## उभ्या भारताचा पहारेकरी !

कुठेंही कुणा द्रोह अन्याय होवो
तयाचा इथें क्षोभ अन् वेदना
इथें वेधितें स्वप्न उन्मार्गगामी
नव्या संगराची घुमे घोषणा
कणा भारताचा असा सह्य येथें
कधीं मेरु, मंदार, द्रोणागिरी
महाराष्ट्र माझा असा वज्रदेही
उभ्या भारताचा पहारेकरी १

इथें रात्रिची ज्योत जागे भवानी
दिसा कष्टतो स्वेदगंगाधर
शिजे ब्रह्मनैवेद्यसें अन्न येथें
तया मंत्रितो वेदवैश्वानर
नद्या या न, या भाग्यरेषा उद्यांच्या
झरे तेज त्यांचें घरीं डोंगरीं
महाराष्ट्र माझा प्रतापी विरागी
उभ्या भारताचा पहारेकरी २

इथें गर्जते मर्द भाषा मराठी
जिचीं अमृता झोंबती अक्षरें
रसें वेधिते सत्त्वगुह्यार्थ सारे
स्वरें छेदिते अनृताचीं शिरें

इथें देव भक्तास धुंडीत येतो
विटेंतून येथें उठे पंढरी
महाराष्ट्र माझा असा भक्तिगाथा
उभ्या भारताचा पहारेकरी ३

इथें गाजलें धर्मसाम्राज्य पूर्वीं
उभी आजला राष्ट्रधर्म—ध्वजा
जगीं स्थापण्या क्रांतिमूल्यें युगाचीं
सदा सज्ज ही सामराज्य-प्रजा
हिनें खोदिलीं भूतकाळांत लेणीं
पुढें याहुनी दिव्य कारागिरी
महाराष्ट्र माझा महत्स्वप्नद्रष्टा
उभ्या भारताचा पहारेकरी ४

अशी तापसी शुद्ध स्वातंत्र्य-भू ही
शुचिष्मंत चारित्र्य येथें पिके
कधींही कधींही कृतांतापुढें ही
तृणाचाहि माथा न येथें झुके
जयां स्वप्न हें मोहि ते सर्व या रे
करा धन्य येथें कुडी वैखरी
महाराष्ट्र माझा तसा आपुलाही
उभ्या भारताचा पहारेकरी ५

—बा. भ. बोरकर

# जय महाराष्ट्र

जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान
जय डोंगर हे; जय जल इथलें; जय वृक्ष आणि पाषाण

घराघरांतुन इथल्या घुमलीं महानुभावी गाणीं
ओवि ऐकतां जनाबाइची डोळां दाटे पाणी
तिन्ही लोक आनंदें भरिते श्रीतुकयाची वाणी
शक्तीचें भक्तीचें आहे येथें तीर्थस्थान
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान

हिरवें कोंकण करी वळेसर गंधित बकुळफुलांचा
कृष्णांकाठीं काळी माती उधळी खच मोत्यांचा
गोमंतक भूमी ही नटली साज लाख रत्नांचा
फुलाफुलांतुन झऱ्याझऱ्यांतुन सौंदर्याचें गान
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान

घामाच्या थेंबांत येथल्या संगम शततीर्थांचा
थाप डफावर पडतां उसळे थेंब थेंब रक्ताचा
पराक्रमाचा कंठ भूषवी हारच शृंगाराचा
कडकडतो पोवाडा; लचके लावणिची मग तान
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान

अन्यायावर पाय रोवुनी किल्ले शूर मराठी
अन् शूरांचा गरम पवाडा शूर अजूनहि गाती
आपत्तींचा पहाड दचके बघुनि मराठी छाती

शिवरायांच्या चारित्र्यावर विश्वगोल कुर्बान
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान

इथेंच हरिनें अहो वाहिलें पाणी नाथांसाठीं
जनाबाइचें दळण घेउनी बैसे तो जगजेठी
इथें बोबडा नामा भरवी घांस विठूच्या ओठीं
या मातीच्या भक्तीसाठीं देवहि होत लहान
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान

श्रमणाऱ्यांच्या नवस्वप्नांचा इथें घुमे ललकार
पहिल्या घांसावरती येथें श्रमिकाचा अधिकार
समसंत्तेला हरेक इथलें मनगट हो आधार
इथें विसरतिल मानवतेस्तव सारे भूक तहान
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान

शिवरायाच्या तलवारीचें तेज इथें प्राणांना
तानाजीच्या कुर्बानीची धार इथें गाण्यांना
इथें जिण्याची अम्हा न पर्वा न्यायास्तव लढतांना
सह्याद्रीच्या उंच कड्यांवर अहो घुमे जयगान
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान

दूर तिथें क्षितिजावर देखा नवीन तेजोरेषा
खेड्यांमधल्या घराघरांतुन नवी थरारे आशा
नवींच स्वप्नें, नवींच ध्येयें, नवीच त्यांची भाषा
या स्वप्नांचें या ध्येयांचें फडके उंच निशाण
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान

जय डोंगर हें, जय जल इथलें, जय वृक्ष आणि पाषाण

—मंगेश पाडगांवकर

# माय मराठी, नांव मराठी

माय मराठी, नांव मराठी, मराठमोळा प्राण
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान !

लाव्हारस वाहतां जन्मला कातळ काळा देह
तिथें जन्मलों, तिथें वाढलों, तें माझें प्रिय गेह
भीमा गोदा कृष्णेमधुनी प्यालों मी इतिहास
स्वातंत्र्याच्या वाऱ्यानें मी भरुन घेतले श्वास
प्राजक्ताच्या फुलाफुलांतुन हसली कोमल प्रीत
रुक्ष मनाला मृदुता शिकवी शाहीरांचें गीत
हिरवळलेलें म्हणून येथें दिसती हे पाषाण
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान !

प्रपंच तरुनी जाया ध्यावें परमेशाचें नांव
नामयास नामामृत लाभे भोळा त्याचा भाव
एक पताका भगवी देई समतेचा आदेश
महार चोख्यासवें नाचले एकनाथ ज्ञानेश
' मउ मेणाहुन परन्तु आम्ही वज्राहून कठोर ! '
अभंगवाणी तुकयाची दे शिकवण ऐशी थोर
ज्ञानोत्तर भक्तीचें आम्हां श्रेष्ठ मिळे वरदान
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान !

' अमृतासही जिंकिन पैजा ' सहज लाविल होड
संस्कृत विद्वत्तेला दिधली भाविक भोळी जोड

माझ्या ज्ञानेशाची ओवी केवळ अमृतधार
मायमाउलीवरी चढविलें 'लेणें देशीकार'!
'उद्धरीन स्त्रीवैश्यशूद्र मी' अशी तयाची भाक
जनामनांतुन ब्रह्मसुखाचे मळे पिकविले लाख
त्या ओवीचें हृदयीं माझ्या अजुन गुंजतें गान
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान!

श्रीशिवबांनीं साद घालुनी जागविले पाषाण
शेतकरी मावळे भाबडे पणा लाविती प्राण
स्वातंत्र्याचा दऱ्यादऱ्यांतुन घुमतां दिव्य पुकार
किल्ल्याकोयत्यांवर लखलखली तलवारीची धार
त्या नांवाची, त्या बाण्याची सतत राखणें लाज
लाचारीचें जीवन जगणें कसें रुचावें आज?
नसांत अजुनी मंत्र तोच तो, ऐका लावुन कान
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान!

अस्मानी सुलतानी होतां स्तिमित जाहला देश
चाल बदलली, रीत बदलली, आणि बदलला वेष
ये परक्यांची सत्ता त्यांचे कुणीं पूजिले पाय
तरी मराठी मन हें नाहीं झालें कधिं असहाय
फुले, रानडे, टिळक, गोखले, आगरकर नरवीर
कणखर बाणा दावुनि दिधला संकटांतही धीर
तोच वारसा पुढें चालवूं अम्हां तयांची आण
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान!

महाराष्ट्रभू माझी मी तर तिचा लाडका बाळ
तिच्या दुधावर झाला माझ्या प्राणांचा प्रतिपाळ
अथांग ममता तिच्या अंतरीं, संजीवन स्पर्शांत
कणखर श्यामल तिचें रूपडें नित्य वसे नयनांत
मीठभाकरीसवें भरविला तिनें अम्हां अभिमान
तिच्या अमृतमय बोलांमधुनी स्रवतें काव्य महान्
ओवाळावे तिच्यावरुनी नित हे पंचप्राण
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान !

— शान्ता ज. शेळके

# प्रणाम घेई महाराष्ट्रा

शतजन्मींची तव पुण्याई आज फळा आली
प्रणाम घेईं महाराष्ट्रा तूं या मंगलकालीं ॥ ध्रु० ॥

ओवी ज्ञानेशाची स्फुरली यशोगीत गाया
इंद्रायणीचे कुंभ भरोनी गेला श्रीतुकया
तुला अर्पिली जनाबाईनें वाकळ निज न्यारी
तुजसाठीं कबीरानें विणिले शेले जरतारी १.
निळ्या डफावर थाप हाणुनी शाहिरी वाणी
मानवता रक्षाया गाई तेजस्वी गाणीं
मऱ्हाटमोळ्या अभिमानाची ती दिव्य कहाणी
शिवरायाची अविरत सेवा सुफलित अजि झाली २.
तळहातीं शिर घेउनि लढले मर्दमराठी जन
कितिकांनीं तुजसाठीं दिधलें प्राणांचें दान
तुझ्या कुशीचें तेज झळाळे अटकेच्या पार
भीमाथडीच्या वारूवरती होउनियां स्वार ३.
तुझ्या पाठिशीं रक्षायाला सह्याद्री हा उभा
यशोपताका भिडवायाला जाई उंच नभा
तुझ्या कीर्तिच्या मांगल्याची पसरे नित द्वाही
डंका, नौबत, झडे, चौघडा सुरेल तशि सनई ४.
भीमा, कृष्णा, गोदा, पूर्णा सुजला भाग्यवती
ललाटरेषा जणूं तुझ्या त्या सुफल तुला करिती
कविवर गाती तुझे पवाडे किति वैभवशाली
गोड मानुनी घेशिल का ही शब्दांची अंजली ? ५.

— चारुशीला गुप्ते

# नव महाराष्ट्रा !

यावें यावें महाभागा
नव - महाराष्ट्र देशा
उधळितों तुजवरी
माझ्या फुललेल्या आशा. १

आज लढले जे वीर
तया मुजरा मानानें
भाव भक्तीनें आजच्या
हुतात्म्यांना हीं वंदनें. २

झाला सह्याद्रि जागृत
आतां झाले सर्व जागे
अहो, मुका सातपुडा
तोही आज बोलूं लागे. ३

जय महाराष्ट्र जय –
महाराष्ट्र तुझें नांव
जयघोषीं निनादत
‘ हर हर - महादेव ’ ४

उधळीतों तुजवरी
तुझ्या दिव्य इतिहासा
आज मागतो भंडारा
भावि कर्तव्याच्या आशा ५

## नव महाराष्ट्रा !

यावें यावें महाभागा
नव - महाराष्ट्र देशा
उधळितों तुजवरी
माझ्या फुललेल्या आशा. १

आज लढले जे वीर
तया मुजरा मानानें
भाव भक्तीनें आजच्या
हुतात्म्यांना हीं वंदनें. २

झाला सह्याद्रि जागृत
आतां झाले सर्व जागे
अहो, मुका सातपुडा
तोही आज बोलूं लागे. ३

जय महाराष्ट्र जय –
महाराष्ट्र तुझें नांव
जयघोषीं निनादत
' हर हर - महादेव ' ४

उधळीतों तुजवरी
तुझ्या दिव्य इतिहासा
आज मागतो भंडारा
भावि कर्तव्याच्या आशा ५

आज आम्हीं आत्मबळें
अंगांतल्या शक्तिबळें
उधळीतों तुजवरी
तीन कोटींचे जिव्हाळे ६

जरी आज कांहीं भक्त
केले विभक्त येथले
आणूं ओढूनीयां तया
करूं पुन्हां तुझ्यांतले ७

वाचा आमुचें हें भाळ
तेज दिसेल क्षात्रांचें
नव्हे आमुचें आभाळ
फुका शेंडे नक्षत्रांचे ८

ध्याऊं ज्ञानाचा तो वेद
कर्मयोगाच्या संवादीं
घेऊं विज्ञानाचा वेध
आम्ही महाराष्ट्रवादी ९

हिणवोत कुणी आम्हां
" यांची वृत्ति संकुचित "
अहो काय तयां ठावें ?
त्यांत आमुचें संचित १०

नोहे संकोच आमुचा
येरा गबाळाचें काम
त्यांत आहे लोपलेला
जगताचा आत्माराम ११


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ...
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

संकोचांतला विकास
इथें होतो विश्वंभर
माझ्या ज्ञानेशानें केलें
‘ विश्व हेंच माझें घर ’ १२

भगवंत-मय माझा
असा भागवत धर्म
जयजगताचें, त्यांत
येऊनीयां गेलें मर्म १३

भारताच्या संरक्षणीं
धांव घ्यावया तांतडी
परंपराच आमुची
घेऊं पहिल्यानें उडी ! १४

यावें यात्रें नव्या युगीं
नव-महाराष्ट्र देशा !
पूर्ण होईल नव्यानें
तुझा अपुरा नकाशा १३

आज स्वतंत्र भारतीं
लोकशाहीच्या कारणें
उधळीतों तुजवरी
नवा जोम, नवीं मनें १६

—सोपानदेव चौधरी

# महाराष्ट्र – गीत

जय महाराष्ट्र ! जय महाराष्ट्र ! ! जय महाराष्ट्र हा ! ! !
वर्धिति याला भीमा, कृष्णा,
तापी, गोदा आणि कोयना ;
समुद्र याचा निळा पाळणा ;
सातपुडा-सह्याद्रीचे कडे खडे जागती पहा !
जय महाराष्ट्र ! जय महाराष्ट्र ! ! जय महाराष्ट्र हा ! ! !

श्रीरामाची शरण्यभूमी ;
शिवरायाची समर्थभूमी ;
दगडफुलांची अमुची भूमी ;
संतांच्या भक्तिचा मळा ; कवीश्वरांचें काव्य महा !
जय महाराष्ट्र ! जय महाराष्ट्र ! ! जय महाराष्ट्र हा ! ! !

सत्वरक्षणीं कंकण बांधुनि,
बुद्धि-वीर्य-चापल्य गाजवुनि,
भूषवील हा त्रिखंड अवनी,
सर्वांचा आधार खरा एकछत्र भारतांत हा !
जय महाराष्ट्र ! जय महाराष्ट्र ! ! जय महाराष्ट्र हा ! ! !

—पुरुषोत्तम शिवराम रेगे

# नमोस्तुते महाराष्ट्रा

नमोस्तुते महाराष्ट्रा माझ्या मायदेशा
ज्ञानेशाच्या कसोटीची इथें स्वर्णरेषा

श्वानापाठीमागें धांवे येथें अन्नदाता
महाराचें पोर उरीं लावी ब्रह्मज्ञाता

वज्रा भेदणारा येथें जन्मला अभंग
कुंभाराचा, महाराचा येथें संतसंग

संन्याश्याच्या झोळीमाजीं दान राज्यश्रीचें
कमंडलूंतून ओज सांडतें शस्त्राचें

झाला शंकराचा शूल भवानीचें पातें
सिंहाशींच लावी गड कोंडाणा हा नातें

तुटे खांद्यांतून हात शस्त्र सुटेनाच
भांडीं वाजल्यावांचून प्राण जाईनाच

धुंद होऊन मद्यानें चूक होतां थोडी
स्वत्वरक्षणा सोडून द्यावींत कातडीं

वैभवांत संन्यासी हा व्रती, कर्मयोगी
क्षात्रधर्म अंगीकारी प्रसंगीं विरागी

येथें शिलाखंडामाजीं कैलासाचा वास
सह्यगिरीच्या माथ्याला ठेंगणें आकाश

— श्रीकृष्ण पोवळे

# गर्जा महाराष्ट्र माझा

गर्जा महाराष्ट्र माझा, जय जय महाराष्ट्र माझा ॥ ध्रु० ॥

रावी ते कावेरी भारत भाग्याच्या रेषा
निळें निळें आकाश झाकतें या पावनदेशा
तुंग हिमालय, विंध्य, अरवली सह्याद्रि निलगिरी
उत्तर दक्षिण वारे पाउस वर्षवीत भूवरीं
रेवा, वरदा, कृष्ण कोयना भद्रा गोदावरी
एकपणाचें भरती पाणी मातीच्या घागरीं
भीमथडीच्या तट्टांना या यमुनेचें पाणी पाजा
गर्जा महाराष्ट्र माझा ॥ १ ॥

भीति न आम्हां तुझी मुळींही गडगडगाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रिचा सिंह गर्जतो शिव शंभूराजा
दरीदरींतुन नाद गुंजला महाराष्ट्र माझा
गर्जा महाराष्ट्र माझा ॥ २ ॥

गलमुच्छे पिळदार मिशीवर उभें राहतें लिंबू
चघळित पानें पिकलीं करितो दो ओठांचा चंबू
मर्द मराठा गडी ओढतो थंडीची गुडगुडी
ठसक्याची लावणी तशी ही ठसकदार गुलछडी
रंगरंगेला रगेल मोठा करितो रण मौजा
गर्जा महाराष्ट्र माझा ॥ ३ ॥

काळ्या छातीवरी कोरली अभिमानाचीं लेणीं
पोलादी मनगटें खेळती खेळ जीवघेणी
निढळाच्या घामानें भिजला
दारिद्र्याच्या उन्हांत शिजला
देशगौरवासाठीं झिजला
दिल्लीचेंही तक्त राखतो महाराष्ट्र माझा ॥ ४ ॥

— राजा बढे

काळ्या छातीवरी कोरली अभिमानाचीं लेणीं
पोलादी मनगटें खेळती खेळ जीवघेणी
निढळाच्या घामानें भिजला
दारिद्र्याच्या उन्हांत शिजला
देशगौरवासाठीं झिजला
दिल्लीचेंही तक्त राखतो महाराष्ट्र माझा ॥ ४ ॥

— राजा बढे

## महाराष्ट्राच्या कृष्णेकांठीं !

मुशाफिरा, चल माझ्यासाठीं
महाराष्ट्राच्या कृष्णेकांठीं ॥ ध्रु० ॥

अपूर्व सुंदर मूर्त होऊनी,–
जिथें नांदतें शौर्य मराठी
हरहर गर्जत जरिपटक्याची –
जिथें नाचली भगवी काठी १

रक्त ठिबकत्या समशेरीचा—
टिळा शोभतो जिच्या ललाटीं
शिवचरणांवर जिनें उधळलीं
प्रसादपुष्पें अनंत कोटी २

तीर्थ रुपलें जिच्या तटाकीं
दत्त दिगंबर भक्तीसाठीं
जिला लाभली समर्थ गुरुची
चैतन्याची 'शिकवण मोठी ३

शीळ घालते नर-सिंहांना
जिथें लावणी सुस्वर कंठीं
थाप डफावर पडतां जेथें
उठति प्रेतें क्रांतीसाठीं ४

—पी. सावळाराम

# सह्याद्री

कैलासावर शिंग वाजतें अखंड ज्याच्या श्रीकीर्तीचें
दिव्य प्रतापी दर्शन घे तूं रसिका माझ्या सह्याद्रीचें ॥ ध्रु० ॥

पूर्ण स्वयंभू दिव्यत्वाला शरणागत जो शंकरभोळा,
ज्योर्तिलिंगहि अर्पुन आपुलें, प्रसाद ठेवी तिसरा डोळा,
तांडव नर्तन करतो पुढतीं रूप घेऊनी महारुद्राचें —
दिव्य प्रतापी दर्शन घे तूं रसिका माझ्या सह्याद्रीचें — १

शुभकल्याणी मायभवानी मुगुट चढविते शिवशाहीचा,
बावनगडची घेत सलामी झेंडा फडके पराक्रमांचा,
महाराष्ट्राच्या स्फूर्तिदैवता झडती मुजरे मानवतेचे —
दिव्य प्रतापी दर्शन घे तूं, रसिका माझ्या सह्याद्रीचें — २

परचक्राची चाहुल येतां हुंकारांतून मृत्यू उठतो
कांपत थरथर पश्चिम सागर कैक योजनें मागें हटतो
प्रळयंकर तें रूप पाहुनी दिपती डोळे रविचंद्रांचे
दिव्यप्रतापी दर्शन घे तूं, रसिका माझ्या सह्याद्रीचें — ३

थांबव संगर, हांक शुभंकर मारी जेव्हां भारतमाता
निजभूचरणीं केवळ नमवी उन्नत अपुला विजयी माथा
मातृभक्तीला फुटती पाझर भीमा कृष्णा गोदावरीचे
दिव्यप्रतापी दर्शन घे तूं रसिका माझ्या सह्याद्रीचें — ४

—पी. सावळाराम

# त्रिभंगलेला अभंग झाला....

( जाति : हरिभगिनी )

**त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश**
महा-राष्ट्र धर्माचा पुनरपि घुमविल जगतीं संदेश ॥ ध्रु० ॥

बहुत दिनांचें स्वप्न आजला बहुतांशीं हो साकार ।
जनता शिव-शक्तीचा गाजे आज नभीं जयजयकार ॥
अखिल मराठा एक जाहला, नुरला वैफल्याचा लेश ....

सातपुड्याचा जटा—मुकुट तो शिरीं जयाच्या शोभतसे ।
सह्यगिरी—कोदंड वीरवर दक्षिण करीं जो धरीतसे, ॥
घनश्याम त्या श्रीरामाचा आज संपला वनवास....

आज विघटना—पाशांमधुनी मुक्त जाहला वनराज !
नव तेजें हा पुनः चमकतो भारतभूचा शिरताज !
सिंधू-सागर विशालतेचा करितो याच्या उद्‌घोष...

भारतवर्षासाठीं ज्यानें सदैव अग्रेसर बनुनी
निजरुधिराचे मळवट भरुनी केली धरणी सुहासिनी,
प्रदेश तो हा – शिवरायाचा – वीरश्रीचा उन्मेष...

करितां ह्याचे सह्य—केसरी असह्य गर्जित रोषानें
अन्यायाचे मदांध कुंजर थरथरती भयभीतीनें
झुंजारांचा असा देश हा, आज गर्जतो सावेश...

—शूर मराठी नरवीराचें व्यर्थ न झालें बलिदान
आज लाभलें या देशाला अभंगतेचें वरदान
पाठीराखा सदैव याचा भक्तपरायण परमेश...

रक्तपिपासू तक्षक सुत हो! जनमेजय हा दक्ष असे
समानतेचें स्वतंत्रतेचें पूजन हा नित करीतसे
सिद्ध असे हा तनमनपूर्वक सद्धर्माच्या सेवेस...

—उज्वल याची परंपरा ती, उजळचि याचें भवितव्य !
नव्या युगांतहि भगवा झेंडा धरील हातीं हा भव्य
विक्रम–वैराग्याचा पाळिल संतांचा हा उपदेश...

**—विद्याधर गोखले**

# महाराष्ट्र — गीत

( जिकडे तिकडे स्वातंत्र्याचा घोष ... या चालीवर )

महाराष्ट्राच्या भाग्यदेवते ! भारतवर्षांतरीं ।
अमर हो नांद सुखें मंदिरीं !   ॥ ध्रु० ॥

इतिहासांतरिं नवराज्याची पुण्यनिर्मिती अहा ।
पहा आनंदसोहळा महा ॥
छत्रपतींच्या पुण्याईनें टिळकांनीं रेखिला ।
तिलक तो अखंड राहो तुला ॥
चाल   हें लोकशाहिचें राज्य उदय पावलें ।
जनतंत्र जयाचें ब्रीद असें थोरलें ॥
बहुरंग स्वरूपें मुंबापुर गर्जलें ।
भारताचिये भूषण नगरी राजधानि सुंदरी ॥ अमर हो .... ॥ १ ॥

विदर्भ आणि मराठवाडा कोंकणचा प्रांत हा ।
रम्य तो महाराष्ट्र देश हा ।
भक्तिदेश हा ज्ञानदेश हा शूरांचा देश हा ।
सुभग तो पराक्रमी देश हा ॥
चाल   ज्या मायभूमिनें क्रांतिवीर निर्मिले ।
जे मर्द मराठे देशांतरिं गाजले ॥
इतिहास तयांचें करितां पूजन भलें ॥
नवराज्याच्या मंगल दिनिं त्या वंदन वरचे वरी ॥ अमर हो.... ॥२॥

तुकाराम श्रीज्ञानेश्वरहि रामदास आजला ।
सहर्षें आशिस देती तुला ॥
देशभक्त जे होऊनि गेले स्वर्गीतुनि पाहती ।
तुजवरी पुण्यांजलि अर्पिती ॥
चाल ती परंपरा तूं याहि पुढें चालवी ।
स्वातंत्र रक्षण्या महाराष्ट्र जागवी ॥
जयहिंद घोषणें राज्य नवें गर्जवी ।
जयजयकारें ध्वजा फडकवीं सह्याद्रीं अंबरीं ! अमर हो.... ॥ ३ ॥

समता येइल विकास होइल जन होतिल प्रेमळ ।
मनीं ज्या राष्ट्राची तळमळ ॥
गोदा वर्धा चंद्रभागेचें नीर जिथें निर्मळ ।
विषमता नष्ट करी सोज्ज्वळ ॥
चाल राज्यांत होउं दे महाग्रंथनिर्मिती ।
नव ओघ होउं दे आणि नवी जागृती ॥
वाढूं दे उंच ही भारतीय संस्कृती ।
राज्यपदीं बैसली मराठी आज सुवर्णाक्षरीं ! ॥ अमर हो.... ॥ ४ ॥

— विश्वनाथ दामोदर वऱ्हाडपांडे

# माझें राष्ट्र महान्

महाराष्ट्र जय, महाराष्ट्र जय, जयजय राष्ट्र महान्
महाराष्ट्र जय, महाराष्ट्र जय, जयजय राष्ट्र महान्
कोटि कोटि प्राणांत उसळतो एक तुझा अभिमान ॥ ध्रु० ॥

बलिदानें इतिहास रंगला तुझाच पानोपान
तूंच ठेविलें स्वातंत्र्याचें फडकत उंच निशाण
तूं संतांची, मतिमंतांची बलवंतांची खाण
तूंच ठेविला कर्मयोगमय जागृत यज्ञ महान् १

मातीच्या चित्रांत ओतिले विजयवंत तूं प्राण
मराठमोळी वाणी वर्णी वेदांताचें ज्ञान
पंढरींत नांदलें अखंडित भक्तीचें जयगान
ब्रीद न सुटलें झुंझाराचें रणिं होतां निर्वाण २

वज्रापुढती अभंग ठरले तुझेच ना पाषाण
काळालाही जिंकून गेले इथले प्रज्ञावान्
मानवतेचें, समतेचें तूं एकच आशास्थान
पराक्रमावर तुझ्या विसंबे अखंड हिंदुस्थान ३

—चकोर आजगांवकर

# महाराष्ट्राचें गान

एक दिलानें एक स्वरानें गाऊं हें सहगान
महाराष्ट्राचें गान गाऊं या महाराष्ट्राचें गान ।।
स्मरूनि हुतात्मे ज्यांनीं वेंचिले महाराष्ट्रास्तव प्राण
महाराष्ट्राचें गान गाऊं या महाराष्ट्राचें गान ।। ध्रु० ।।

सह्याद्रीचा गिरि पाठिशीं ग्वाही देइ निर्भयतेची
कृष्णा, भीमा, गोदा, पूर्णा तीर्थें हीं पावित्र्याचीं
गडदुर्गांचें, मंदिरांचें मंगल हेंचि स्थान ।। १ ।।

सस्यशामला धरती, इथल्या हरित तृणांचीं पातीं
स्वैर वाऱ्यावरी पवाडे, अभंग, ओव्या तीं गातीं
वेदमंत्रांचें बळ आम्हां मातीचा अभिमान ।। २ ।।

शूर अम्हि हो वारस ज्यांची रणिं मर्दुमकी अनिवार
ज्यांनिं रोविलें निशाण अपुलें दूर दूर अटकेपार
इतिहासीं महाराष्ट्र शोभतें सोनियाचें पान ।। ३ ।।

कोटी कोटी वीर मराठे नांदुं गुण्यागोविंदानें
देश मराठा, धर्म मराठा, जगूं मराठी बाण्यानें
देवांहुनिही वंद्य अम्हां हें अमुचें राष्ट्र महान् ।। ४ ।।

—गंगाधर महाम्बरे

[ पहिल्या बक्षिसाची कविता ]

# महाराष्ट्राचा अभिमान

**निधडी छाती, निःस्पृह बाणा, लववी ना मान ।**
**अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ।। ध्रु० ।।**

प्रिय आम्हांला अमुची भूमि असुं द्या खडकाळ ।
उघडे अन् वैराण आमुचे प्रिय आम्हां माळ ।
आम्हांस ठावें इथेंच येती ‘ समर्थ ’ जन्माला ।
पाषाणांतुनि प्रगटविती जे ‘ कुबडी–तीर्था ’ ला ।
कडेकपारीं खेळवि आम्हां सह्यगिरी तात ।
रक्षित आला, रक्षित राहिल, सोडिल ना साथ ।
तयेंच केलें कणखर आम्हां, दिसलों जरि सान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ।। १ ।।

तलवारीवर पाणी चढवी कृष्णेचें पाणी ।
गोदेंतून ह्या अखंड वाहे संतांची वाणी ।
इंद्रायणीनें अहा तारिली तुकयाची गाथा ।
सान जारी ह्या, सदैव अमुच्या पूज्य अम्हां सरिता ।
देशावरती भाकर कांदा खाऊं शेतांत ।
कोंकणांत ना कमी कुणाला भाजी अणि भात ।
रत्नागिरीचा हपुस असे हो आमुचें वरदान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ।। २ ।।

वनदेवीला फार आवडे कोंकणची भूमि ।
सागर राजा साथ करी तिज गाऊनियां गाणीं ।

लालमातीवर शोभे राई हिरवी घनदाट ।
कूजति मंजुळ रंगदार हे सृष्टीचे भाट ।
देशावरच्या प्रसिद्ध बहिणी – बाभुळ अणि बोरी ।
त्या बोरींना पुनित कराया, इथेंच हो शबरी ।
'श्रद्धेनें हो सुसह्य जीवन' — दे मौलिक ज्ञान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ३ ॥

'सुजला सुफला सस्य श्यामला' विदर्भ भू शोभे ।
शुभ्र कपाशी कशिदावरती, जीव अहा लोभे ।
कवळा कवळ्या हुरडा इथला, एकदांच खाल ।
विदर्भास या विसरुं, म्हणुनी कधीं न विसराल ।
विदर्भ देशीं इंद्र राहिले येउन स्वर्गीचे ।
अमरावती स्थापिली, तीमध्यें देऊळ अंबेचें ।
रुक्मिणीस त्या प्रसन्न झाले तेथें भगवान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ४ ॥

स्वातंत्र्यास्तव अणि धर्मास्तव लढला झुंजार ।
अतुल धोरणी, राजा अमुचा शिवबा रणधीर ।
घोड्यावरूनि कधि न उतरला बाजीराव शूर ।
पुण्यांत असतां बसे दरारा दिल्लीसही दूर ।
टिळक–प्रकाशें दिपुनी गेला, आंग्ल अहा वदला ।
'एकच माणूस देखियला नच लांचेनें बधला' ।
सावरकर तर हिंदुत्वाचा ज्वलंत अभिमान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ५ ॥

उग्र घेऊनी रूप, पेटता कलहाचा वन्ही ।
संत धावले, शान्तीरसाचें घेऊनियां पाणी ।
ज्ञानदेव अन् तुकया–नामा–दास–एकनाथ ।

ज्ञानेश्वरीसम रचिले ज्यांनीं अद्‌भुत हो ग्रंथ !
स्त्री-उद्धारक, तसे सुधारक प्रथम इथें झाले।
आगरकर, गोखले, रानडे, अण्णा अवतरले।
पाणीदार ह्या ललना म्हणुनी ! ताठ सदा मान।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ६ ॥

सरस्वतीचें पुण्यास आहे अमुच्या माहेर।
पंढरपुर ना कुणास ठावें ? तीर्थाचें सार।
'दक्खनकाशी' कोल्हापुर हें खरें कलापूर।
आंतरराष्ट्रिय कीर्ति पावले किती कलाकार।
प्रिय आम्हांतें असे मुंबई प्राणाहुनि खास।
महाराष्ट्राला घेणें मुष्कील तिजविण की श्वास।
— 'जगामधील हो एक' — मिळाला असा जिला मान।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ७ ॥

साधेंभोळें जीवन अमुचें साधें हें अन्न।
माणुसकीला जिवंत ठेवी, अमुचें हें दैन्य।
नसांनसांतुनि अमुच्या खेळे 'इमान' बाजीचें
त्यागाचे अन् शुचित्व देही—त्या 'तानाजीचें।
हांजी हांजी न रुचे आम्हां, रुचे न अन्याय।
हुकुमशाहाच्या माथ्यावरती ठेवूं अम्ही पाय।
बुद्धिची तरवार न ज्यानें केली कधिं म्यान।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा कुणा न अभिमान ॥ ८ ॥

**निधडी छाती, निःस्पृह बाणा लववी ना मान।**
**अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान॥**

—सुशिला बापट

[ दुसऱ्या बक्षिसाची कविता ]

# महाराष्ट्र हें माझें मंदिर

माझें मंदिर, माझें मंदिर ।
महाराष्ट्र हें माझें मंदिर ॥ ध्रु० ॥

संतजनांनीं पाया रचिला
श्रीशिवबांनीं भार वाहिला
वीरवरांनीं रक्त सांडुनी उभारिलें हें शांतीचें घर
माझें मंदिर, माझें मंदिर
महाराष्ट्र हें माझें मंदिर ॥ १ ॥

गोदा कृष्णा सरिता इथल्या
तीर्थ कलश घेऊन ठाकल्या
मराठमोळे शिलेदार शत उभे राहिले दरवाजावर
माझें मंदिर, माझें मंदिर
महाराष्ट्र हें माझें मंदिर ॥ २ ॥

स्वर्ग-सुधेहुन मधुर मधुरतर
मराठबोली अमुची मनहर
इथें जन्मले भूप शिवाजी – टिळक वंद्य जे आज वीरवर
माझें मंदिर, माझें मंदिर
महाराष्ट्र हें माझें मंदिर ॥ ३ ॥

त्या तुकयाची अभंग गाथा
सहिष्णुता या शिकवी जगता
स्वयंप्रकाशी ध्रुवताऱ्यापरि चमके ज्ञानाचा तो ईश्वर
माझें मंदिर, माझें मंदिर
महाराष्ट्र हें माझें मंदिर ॥ ४ ॥

अजुनी इथल्या पाषाणांतुनी
गत शौर्याचीं घुमतीं गाणीं
अमुच्या आकांक्षांचा फडके ध्वज डौलानें सह्यगिरीवर
माझें मंदिर, माझें मंदिर
महाराष्ट्र हें माझें मंदिर ॥ ५ ॥

वैराग्याची अमुची शिकवण
नव्या जगाला देइल जीवन
इथल्या मातीमधुनी फुटती नवे नवे स्फूर्तीचे अंकुर
माझें मंदिर, माझें मंदिर
महाराष्ट्र हें माझें मंदिर ॥ ६ ॥

—श्रीरंग समडोळीकर

[library stamp]

[ तिसऱ्या बक्षिसाची कविता ]

# वारकरी हा, धारकरी हा....

**वारकरी हा, धारकरी हा, महाराष्ट्र देश ।**
**पुष्पाहुनिही मृदुल, कठिणता वज्राची यास ॥**

हा शक्तीचा, हा भक्तीचा, हा नवनीतीचा, ।
महाराष्ट्र प्रिय देश आमुचा प्रतिभावंतांचा ॥

देव आमुचा, धर्म आमुचा सर्वस्वहि हाच ।
हृदयें अमुचीं फुलतीं याचें दर्शन होतांच ॥

सहन न आम्हीं करूं कधींही याचा अपमान ।
यास्तव आम्हीं करून टाकूं जीवहि कुर्बान ॥

याच्या रक्षणकार्यीं पडले लक्षावधि वीर ।
अबला झाल्या प्रबला यास्तव गाजवुनी समर ॥

आजहि अपुलें खड्ग गाजवी वीर मराठा तो ।
भयें पांढरीं तोंडें साऱ्या शत्रुंचीं करितो ॥

परस्परांना मिठी मारुनी दृढ सुदृढ खाशीं ।
धर्मराजकारणें चालतीं महाराष्ट्र–देशीं ॥

हा शूरांचा हा वीरांचा महाराष्ट्र देश ।
सत्पुरुषांचा, आचार्यांचा येथें अधिवास ॥

इथें वहाती भीमा, गोदा, पुण्यजला सरिता ।
इथें विटेवरि ब्रह्म उभें प्रिय पुंडलिकाकरितां ॥

रिपुललनांना अभय निरंतर महाराष्ट्र देशीं ।
माता भगिनी, कन्या त्यांचें नातें आम्हांशीं ॥

ध्यानीं स्वप्नीं सतत दिसावा महाराष्ट्र अमुचा ।
एक मागणें हेंच आमुचें हीच एक इच्छा ।

प्रतापशाली शिवरायांच्या महाराष्ट्र देशा ! ।
समरधुरंधर टिळकांच्या हे महाराष्ट्र देशा ! ॥

सदा भुकेले लोचन अमुचे तुझ्या दर्शनाला ।
श्रेष्ठ न दुसरा तुजविण जगतीं कोणी आम्हांला ! ॥

वाणी अमुची सदा तुझ्या गुणवर्णनांत मग्न ।
तुझ्या कथाश्रवणांत सदोदित आम्ही तल्लीन ॥

पाहूं का तुज वद इंद्राच्या सहस्र नयनांनीं
गाऊं का तुज वद शेषाच्या सहस्र वदनांनीं ? ॥

—नारायण रामचंद्र मोरे

# श्रीमहाराष्ट्र-गौरव-गीत

( चाल-पोवाड्याची )

महाराष्ट्र जय, महाराष्ट्र जय, महाराष्ट्र देशा ।
भारतमाता-रम्यमेखला, प्रिय अमुच्या देशा ॥ ध्र०॥

' दुर्लभ मानवजन्म, भारतीं दुर्लभतर, ' त्यांत
**जन्म महाराष्ट्रांत तयांना, जेच पुण्यवंत !**
' इंद्र ' लोकिंच्या देवांमाजिंहि लागतसे स्पर्धा
पुण्यक्षय व्हायाच्या आधीं धडपडती शतधा
भाग्य महाराष्ट्राचें तैसें नवनवलाईचें
' विष्णु 'हि येती प्रिय पद सोडुनि निज वैकुंठींचें
' पंढरपुर'चा अमाप महिमा उगा न झालेला
' पांडुरंग'-भेटीला अगणित संतांचा मेळा
' ज्ञानदेव ' अन् ' तुकाराम ' अन् संत ' एकनाथ '
एकाहुनि का एक मालिका कोठें जगतांत ? ॥ महाराष्ट्र जय० ॥ १ ॥

' अगस्ति ' सम जिथ महातपस्वी तपास आचरित
**तोच महाराष्ट्र हा आमुचा महाभाग्यवंत**
निःक्षत्रिय करि कितिदां पृथ्वी जिथें ' परशुराम '
दुष्टमर्दना जिथें धांवला ' दाशरथी राम '
ब्रह्मतेज तें, क्षात्रतेज तें एकरूप जेथ
' शापादपि अन् शरादपि ' हि सामर्थ्य जिथें वसत

‘ कृष्ण ’ त्यजी गोकुळ, मथुरा अन् स्वर्णद्वारकाही
भक्तांभेटी तो जगजेठी ‘ दिंडिरवनिं ’ येई
उभा राहिला ‘ विठ्ठल ’ होऊनि कटिं ठेवुनि हात
भक्तजनमनोवांच्छित पुरवायास असंख्यात ॥ महाराष्ट्र जय० ॥२॥

‘ हिंदुपदपातशाही ’ स्थापिति ‘ श्रीशिवराय ’ जिथें
‘ ज्ञान-भक्ति’चा मेळ घालिती ‘ पंत- संत ’ जेथें
‘ विक्रमांत ’ वा ‘ वैराग्यांत’हि हार न कवणाला
स्वराज्य–दानीं ‘ समर्थ- शिवबा ’ जेथें साक्षीला
झेंडे ‘ अटकेपार ’ रोविले ज्यांच्या अश्वांनीं
हदरविलें ‘ दिल्लीचें ’ कितिदां तक्तहि तें ज्यांनीं
जरब केवढी शौर्याची ही शोभतसे ज्यांना
‘ ज्यांचे घोडे जलांत दिसती अरिच्या अश्वांना ’
**महाराष्ट्र हा, महाराष्ट्र हा, त्याच मराठ्यांचा**
स्वातंत्र्यास्तव प्राणहि देती ऐशा मर्दांचा ॥ महाराष्ट्र जय० ॥ ३ ॥

स्त्रिया ‘ जिजाई–ताराबाई ’ सम कर्तबगार
वीरप्रसवा अनेक ललना जेथें महशूर
‘ प्रभाकरा ’सम राष्ट्रिय शाहिर जिथें जन्मतात
‘ केशवसुत ’ ‘ गोविंदाग्रज ’ कवि जेथें विख्यात
‘ देवल’–‘ खाडिलकरादि’ जन्मति जिथ नाट्याचार्य
जिथें ‘बालगंधर्वा’सम बहु निपजति नटवर्य
ललितलेखनीं ‘ फडक्यांचा ’ धरि हात न जिथ कोणी
कला जीवनास्तव राबवते ‘ खांडेकर ’–वाणी
विविध-कलागुणनिपुण–विभूषित ’ महाराष्ट्र असुचा
**नूरच नोहे कोहिनूर हा भारतमातेचा** ॥ महाराष्ट्र जय० ॥४॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 24538 दि: 

महाराष्ट्र हा असे अग्रणी हरेक क्षेत्रांत
राजकीय वा सामाजिक वा शैक्षणिकहि त्यांत
'राजकीय' क्षेत्रांत कुणी का विसरे 'टिळकांना?'
'सामाजिक' क्षेत्रांत त्यापरी 'अण्णा' कर्व्यांना?
'अस्पृश्यांचा' विचार करितां 'शाहूरायांना?'
'शैक्षणिकाच्या' विचारामधें 'भाऊरावांना?'
'देशमुखांचा' कसा करारी विसरेलच 'बाणा?'
'विनोबांचिया' त्यापरि कुणि का विसरे 'भू-यज्ञा?'
"महाराष्ट्र–गौरव–गीता" या विसरूं नका कोणी
रचिलें ज्यातें "वासुदेवसुत कारेकर" यांनीं! ॥ महाराष्ट्र जय०॥५॥

—वासुदेवसुत कारेकर

# महाराष्ट्र गौरव गीत

घनवनगिरिशिरभूषित जय हे दुर्गम रम्य प्रदेशा
सह्याद्रि तुंगशिर नील नभाला भेदुनि पाहि अनंता
शोभविती तुज गोदा कृष्णा सरिता परम पवित्रा
तव धवलामल चरणीं
नत सागर दिन रजनी
गाई तव जय गीता
जय हे जय हे जय हे जय जय जय ॐ महाराष्ट्र प्रदेशा ॥ १ ॥

हरिपदरतजनमंडित जय हे कविवर–मान्य प्रदेशा
ज्ञानेश बाल कथि वेदवचाला गुंगवि पाहि दिगंता
मोर कवी निज आर्यागानीं मोहवि तोहि अनंता
तुकयाचीं मधु गाणीं
शिवगुरु सुंदर वाणी
दावि तव यश पंथा
जय हे जय हे जय हे जय जय जय ॐ महाराष्ट्र प्रदेशा ॥ २ ॥

नतशिररिपुदलभूपित जय हे वीरसु वीर प्रदेशा
सम्राट हर्ष परि मानधनातें अर्पुनि जाइ पदीं या
तो " जगदीश्वर दिल्लीश्वर वा " वंदित हतबल पायां
भगवा जरिपटका तो
अटकेवर फडफडतो
कंपित करि अरि देशा
जय हे जय हे जय हे जय जय जय ॐ महाराष्ट्र प्रदेशा ॥ ३ ॥

निजमति निजबल रक्षित जय हे उन्नत दिव्य प्रदेशा
नाचेल उंच तव कीर्तिपताका जिंकुनि पूर्ण दिगंता
जय हे जय हे जय हे जय जय जय ॐ महाराष्ट्र प्रदेशा ॥ ४ ॥

— **वसंत अवसरे**

# अमुची माय मराठी हो !

अमुची माय मराठी हो !
कल्पतरूचीं फुलें अंगणीं त्यांचा गंध मराठी हो !

ज्ञानेशांनीं केली किमया
इथेंच झाले समर्थ, तुकया
प्रेमाचा, समतेचा घुमतो येथें मंत्र मराठी हो !

सह्याद्रीच्या कडेपठारीं
मर्द मराठी मावळदारीं
अजुन गर्जती शिवप्रभूंच्या स्मरणीं सूर मराठी हो !

भीमथडीला खाउन भाकर
गंग थडीला देतो ढेकर
अटकेवरती राघोजीचा विजयध्वजहि मराठी हो !

वाऱ्यावरती घोडा फेकित
झांशीवाली उठली गर्जत
तिचियारूपें भारतवर्षीं उसळे रक्त मराठी हो !

'स्वराज्य माझा जन्महक्क' ही
दिव्य घोषणा लहरत राही
तिलक भाळिंचा नित्य मिरवितां झाली धन्य मराठी हो !

घनांधकारी बघत चांदणें
भूषविती जे अनंत मरणें
त्या वीरांच्या पायीं अमुचे मुजरे नम्र मराठी हो !

श्रद्धा अमुची आत्मबलावर
ध्येयसाधनीं रमूं निरंतर
अंतर्यामीं नाचे अमुच्या विशाल स्वप्न मराठी हो !

राहूं मिरवत उदात्त बाणा
महाराष्ट्र हा राजस राणा
प्राणपणाला लावूं, गर्जत जयजयकार मराठी हो !

अमुची माय मराठी हो !

—सूर्यकान्त खाण्डेकर

# श्रीमहाराष्ट्र गौरव-गीत

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम क्रमांक २४६३८ वि: ३।८५
९४५६ नों: दि: २८।५।८५

मंगलमय महाराष्ट्रा घेई वंदना
गौरव-गित गावयास स्फूर्ति दे मना ॥ ध्रु० ॥

वेदमंत्र पावन तव हृदयीं कोरले ।
तीर्थक्षेत्र मायभूमि धन्य जाहले ।
भाषेची सेवा करी ज्ञानदेव हा ।
साहित्याची भीमा वाहते अहा ।
भक्तवृंद काव्याची देत चेतना ॥ १ ॥ मंगलमय०

सनातनी धर्माचीं दिव्य मंदिरें ।
संस्कृतीची परंपरा पूज्यही ठरे ।
भक्त-भाव सात्विक अन् तेज आगळें ।
अभंगांत संताच्या प्रेमही मिळे ।
मराठिचा अभिमानही मोद दे मना ॥ २ ॥ मंगलमय०

भगवा ध्वज उंच नभीं डुले पाहतां ।
शिवबाची आठवते राष्ट्रऐक्यता ।
बाजीप्रभू, खंडोजी, धना, तान्हबा ।
शूर-वीर मावळे नि शूर रायबा ।
खड्ग तेज लाजवितें शत्रूच्या मना ॥ ३ ॥ मंगलमय०

महाराष्ट्रीय वृत्तींतून चेतना मिळे ।
देशास्तव केसरींत 'टिळक' गर्जले ।

देशभक्त मुक्तीस्तव प्राण अर्पिता ।
भारतास लाभली सुखें स्वराज्यता ।
वीरांच्या कार्यांतुन मिळे प्रेरणा ॥ ४ ॥ मंगलमय०

हिरकणिसम शूर स्त्रिया, वीर जाहले ।
कवि-लेखक, विद्वान् महर्षि भले ।
शिल्पकार, शाहीर अन् न्यायमूर्ति जे ।
कलाकार, कीर्तिरूपें अमर होत जे ।
मुदित मनें गातें जग स्तुति गायना ॥ ५ ॥ मंगलमय०

सृष्टि करी कृपावृष्टी सतत तुजवरी ।
सुजल सुफल करुनी तुला धन्य ती करी ।
सह्य-गिरी रक्षितसे मायभूमिला ।
समाधान लाभतसे सदा कृषिवला ।
मोत्यांची रास देई हर्षता जना ॥ ६ ॥ मंगलमय०

मातेहुनी स्वर्ग फिका हेंच ऐकिलें
कष्ट करूनी 'मंगल-कलशा'स आणिलें ।
गृहिणी त्या जन्म घेत ह्याच भूवरी ।
थोरांना जन्म देत धन्य त्या तरी ।
देशाचा प्राण तूंच पुण्य पावना ॥ ७ ॥ मंगलमय०

यशमंदिरीं मूर्ति तुझी, गात चौघडे ।
भारतीय पुजती तुज नित्य सांकडे ।
स्तुति सुमनें वाहतील भक्तीनें तुला ।
ओवाळीत पंचप्राण तुंच निस्तुला ।
महाराष्ट्रा ! घेई आतां मानवंदना ॥ ८ ॥ मंगलमय०

— मधुमालती गोडबोले

## महाराष्ट्र-गौरव

आज हो महाराष्ट्र साकार
नवतेजानें तळपूं लागे, रत्नांचें भांडार ॥ ध्रु० ॥

झगडत झगडत अन्यायाशीं
बाळगिलें जें स्वप्न उराशीं
साकारें हें आज प्रकाशीं
उल्हासानें नाचत मन हें । गर्जे जयजयकार ॥ १ ॥

अचल अचेतन स्तंभ जसा कीं
फोडुनि प्रगटे न्याय-रक्षणीं
हिरण्य-कश्यपु वधिला ज्यांनीं
प्रल्हादाचा पाठीराखा । खास जगीं असणार ॥ २ ॥

मेघांनीं जरी वर्षाकालीं
किरणें रवीचीं अडवुनि धरिलीं
प्रभात मंगल शरदामधलीं
कसें म्हणावें आम्ही तिजला । कायम अंतरणार ॥ ३ ॥

गोदा-भीमा कृष्णातीरीं
अमृतवाणी ज्ञानेशांची
सु-यशोगीतें शिवरायाचीं
रिझवायाला भारतभूला । पुनश्च दुमदुमणार ॥ ४ ॥

स्वतंत्रते तव भालप्रदेशीं
सौभाग्याचा तिलक रेखीशीं
मंगल त्याला रूप द्यावया
आजवरीच्या निष्ठेनें हा । महाराष्ट्र लढणार ॥ ५ ॥

अतां मराठी वाणी लेखणी
गर्जत गाणीं कीर्ति प्रांगणीं
चढेल पुनरपि राज्य आसनीं
सह्याद्रीची रुद्रतपस्या । आज फला येणार ॥ ६ ॥

— आशा दामले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
नों दि: ......
REFBK-0011224
REFBK-0011224

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा ॅ. स्थळप्रत.
अनुक्र
वि:
क्रमांक
नों: दि:

# महाराष्ट्र गौरव-गीतें

"उद्यांचे कवी हो! महाराष्ट्राचें हृदय तुमच्या हातीं आहे. आपल्या प्रतिभासंपन्न वाणीनें तें नाचूं लावा, त्याची उडी वाढवा आणि स्वतःच्या जोराची व कर्तृत्वाची त्याला साक्ष पटवा. त्याचें सामर्थ्य आणि भाग्य ऊर्जितदशेस आणा आणि महाराष्ट्राचा संसार खरोखर संसार होईल अशीं गीतें गा!" कै. **वासुदेव बळवंत पटवर्धन** यांनीं उण्यापुऱ्या चार तपांपूर्वी आपल्या 'काव्य आणि काव्योदय' या निबंधाच्या शेवटीं वरीलप्रमाणें कळकळीचा उपदेश केला, हाच उपदेश त्यांच्याच शब्दांत कै. **माधवराव पटवर्धन** यांनीं बडोदें येथील महाराष्ट्र-साहित्य संमेलनांत काव्यविभागाच्या अध्यक्षपदावरून मराठी सारस्वतांना पोहोंचविला.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या परम मंगल प्रसंगीं आजच्या कवींनीं गायिलेलीं हीं गीतें—हीं वाचतांना मराठी भाषेंतील सामर्थ्य त्यांतील आशयाशीं एकरूप झाल्याचें आपल्या प्रत्ययाला येईल. स्वतःला मराठी म्हणवणाऱ्या प्रत्येकानें महाराष्ट्रगौरवाची ही कथा वाचलीच पाहिजे. "शब्दरंजनस्पर्धे"नें प्रकाशित केलेलें हें 'शब्दध्वनि-चित्र' दीर्घकाळ आपल्या स्मरणांत राहील.

# शब्द आणि अर्थ

शब्द हे अर्थवाही असतात. शब्द उच्चारतांच आपणांस अर्थाचा बोध होतो. शब्द आणि अर्थ ह्यांतील ही एकरूपता लक्षांत घेऊनच महाकवि कालिदासानें आपल्या महाकाव्याच्या प्रारंभीं शंकर आणि पार्वती ह्यांना वंदन करतांना

**वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।**
**जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥**

असा मनोज्ञ श्लोक लिहिला.

शब्द हे अर्थवाही आहेत, अर्थरूप आहेत तसेच 'अर्थदायी' ही आहेत हें आपणांस प्रत्यक्ष पटविणारी शब्दरंजन स्पर्धा कौशल्यपूर्ण चढाओढींबरोबरच संग्राह्य व सद्विचारप्रधान पुस्तकेंही आपल्या सेवेस सादर करते.

(१) श्रीसमर्थ रामदासस्वामीकृत **श्रीमनाचे श्लोक**
(पृष्ठें ३२) किंमत फक्त ६ नये पैसे

(२) **अभंग तुकयाचे** (श्रीतुकाराममहाराजांचे निवडक अभंग)
(पृष्ठें १२८) किंमत ३० नये पैसे

(३) **महाराष्ट्र गौरव-गीतें** (नामवंत कवींचीं मुद्दाम लिहवून घेतलेलीं गीतें) किंमत रु. १-५०

---

**प्रमुख विक्रेते :**

श्रीसमर्थ ग्रंथ भवन,
बनाम हॉल लेन,
**मुंबई ४**